


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784







वर्ष ३ रे अंक : १७८ वा गुरूवार दि २८ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जमीन व्यवहारांच्या पडताळणीबाबत बुलढाणा जिल्ह्यात निर्णय कधी होणार?

## पुण्यात कारवाईला सुरवात, बुलढाण्यातील वरिष्ठ अधिकारी मात्र अद्यापही गप्प...

### महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे बुलडाणा महसूल विभागाकडे आपले लक्ष केव्हा केंद्रित करणार

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या काही महिन्यांमध्ये पुणे जिल्ह्यात जमीन व्यवहारांमध्ये झालेल्या अनेक प्रकारच्या अनियमिततांच्या तक्रारी प्रचंड वाढल्यामुळे राज्याचा महसूल विभाग ॲक्शन मोडवर असून, गेल्या काही वर्षांमध्ये झालेल्या जमीन मोजणी,खरेदी-विक्री, सातबाऱ्यावरील सर्व नोंदी, त्यासंदर्भात देण्यात आलेले शासकीय आदेश या सर्वांची तपासणी करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रकारामुळे पुणे महसूल विभागात चांगलीच खळबळ उडालेली आहे.परंतु बुलढाणा जिल्हा देखील जमिनीतील गैरव्यवहारांबाबत अपवाद राहिलेला नाही.परंतु बुलढाण्यात मात्र अद्यापही जमीनीची कागदपत्रे व व्यवहारांबाबत अद्यापही कोणतीच कारवाई करायला तयार नसल्याचे दिसत आहे. अधिकाऱ्यांच्या या ढिसाळपणामुळे मात्र महसूल विभागातील काही भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांचे फावते आहे. राज्याच्या कर्तव्यदक्ष महसूल मंत्र्यांनी खऱ्या अर्थाने याकडे पाहणे गरजेचे आहे.बुलढाणा जिल्ह्याच्या महसूल विभागात वर्षानुवर्षांपासून एक महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम प्रस्थापित करीत आहे. विजय दत्तात्रय टेकाळे हे त्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव. भ्रष्टाचार करताना कसलीही लाजलज्जा न बाळगता या महाठगाने भ्रष्टाचारात आता अक्षरशः पीएचडी प्राप्त केली आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपली नोकरी व पदाचा दिवसाढवळ्या दुरुपयोग करून अनेक जमिनीमध्ये गैरव्यवहार केले. अनेकांची लुबाडणूक केली. त्यातून प्रचंड बेनामी माया जमवली. शासनाच्या महसुलाला चुना लावला. अनेक नागरिकांची धादांत फसवणूक केली. मात्र एव्हढे सगळे करून त्याला सगळे गुन्हे आजवर माफ करण्यात आले. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या सततच्या पाठपुराव्यामुळे अखेर काही दिवसांपूर्वी टेकाळे नावाच्या या महाठगाची मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथे बदली करण्यात आली. टेकाळे हे वर्षानुवर्षे एकाच पदावर राहत होते. कारण पदावरून हटल्यास आपला भ्रष्टाचार बाहेर येईल, याची त्यांना भीती होती. विशेष म्हणजे टेकाळेंच्या बेशरमपणे एकाच जागी चिकटून राहण्यात त्यांना काही वरिष्ठ अधिकारी देखील मदत करीत होते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने एव्हढ्या मोठ्या प्रमाणात पाठपुरावा केला की, या वेळेस तालुक्याच्या बाहेर टेकाळेंची बदली करणे ही प्रशासनाची अक्षरशः मजबुरी बनली होती. पुणे जिल्ह्यात जमिनींमध्ये गैरव्यवहार उघड झाल्यानंतर आता गेल्या काही वर्षांमध्ये जी काही जमिनीची मोजणी वा सातबाऱ्यावर बदल करण्यात आले, त्या सर्वांची चौकशी करून ज्यांनी गैरव्यवहार केला आहे त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. यासंदर्भात पुण्याचे महसूल आयुक्त आणि जिल्हाधिकारी हे ॲक्शन मोडवर आहेत. गेल्या पाच वर्षांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी जमिनीसंदर्भात जे काही निर्णय घेतले, त्याची पडताळणी करण्यासाठी तालुकानिहाय अधिकाऱ्यांच्या नेमणुका देखील करण्यात आल्या आहेत. त्याच धरतीवर बुलढाण्यात देखील चौकशी करण्याची गरज आहे. या ठिकाणी देखील जमिनीच्या गैरव्यवहारांची चौकशी झाल्यास कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार बाहेर येऊ शकतो. काही भ्रष्टाचाऱ्यांना जेलची वारी करावी लागू शकते. महसूल प्रसासनावर लोकांचा विश्वास वाढण्यासाठी खरे तर ही कारवाई गरजेची आहे.मात्र, मुख्य मुद्दा आहे की अशी चौकशी व कारवाई करण्याची महसूलच्या अधिकाऱ्यांमध्ये हिम्मत आहे का? कारण गेल्या अनेक वर्षांमध्ये विजय टेकाळे नावाच्या महाठगाची व महाभ्रष्टाचाऱ्याची सर्व पापे अधिकाऱ्यांनी पोटात घातली. नाही म्हणायला त्यांची मेहकर तालुक्यात बदली केली आहे, परंतु ही बदली रद्द करण्यासाठी



महसूल मंत्री,लोकप्रतिनिधी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक या प्रकरणाकडे लक्ष केव्हा देणार...

टेकाळे जोरदार लॉबिंग करण्याची शक्यता आहे. ते वेळप्रसंगी अधिकाऱ्यांवर आपल्या संघटनेच्या माध्यमातून दबाव आणू शकतात. परंतु आता नुसते बदलीवर भागणार नाही, तर टेकाळेंना भ्रष्टाचार प्रकरणी थेट सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, तसेच त्यांनी बेबंद भ्रष्टाचारातून कमावलेली चल अचल संपत्ती लवकरात लवकर शासन दरबारी जप्त करावी. असे झाल्यास भ्रष्टाचाऱ्यांना जरब बसेल व महसूल विभागाचे कामकाज सुरळीत चालेल. जोपर्यंत हे सर्व काही होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने भ्रष्टाचाराविरोधात आपली लेखणी सुरूच ठेवणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

# गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट;आई व मुलगा गंभीर जखमी मलगी गावात खळबळ!

जनसंचलन/ चिखली

चिखली तालुक्यातील मलगी गावात काल रात्री भीषण दुर्घटना घडली. अंगणवाडी मदतनीस असलेल्या शोभाबाई रमेश परिहार यांच्या घरात गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन घर उद्ध्वस्त झाले. या भीषण स्फोटात शोभाबाई व त्यांचा २४ वर्षीय मुलगा राजेश परिहार गंभीररित्या भाजल्याने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण पसरले आहे. काल (दि. २६ ऑगस्ट) रोजी रात्री साडेआठच्या सुमारास ही घटना घडली. स्वयंपाक करत असताना अचानक सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. अवघ्या क्षणात स्वयंपाकघरात ज्वाळा उसळल्या आणि आईमुलगा त्यात सापडले. स्फोटाचा आवाज एवढा प्रचंड होता की गावकऱ्यांनी घराबाहेर धाव घेतली. घटनेत शोभाबाईंच्या अंगावरील साडी जळून खाक झाली असून हाताला गंभीर भाजल्या आहेत तसेच केस जळाले आहेत. मुलगा राजेशच्या पायालाही गंभीर भाजल्या आहेत. गावकऱ्यांनी तात्काळ धाडस दाखवत जखमींना बाहेर काढले व पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवले. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या दुर्घटनेनंतर परिसरात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, स्फोटानंतर गावात मोठी गर्दी जमली. नगरपरिषद चिखलीचे अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले व आगीवर नियंत्रण मिळवले. चिखली पोलिसही घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.



तंटामुक्ती अध्यक्ष श्रीकांत राऊत, सरपंच विनायक साप्ते व दिलीप शितोळे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली

# ...बदलता उत्सवरंग...

## संपादकीय लेख

कोटी सूर्यांचे तेज ज्याच्या ठायी आहे, जो सर्व विघ्नांचा विनाश करतो अशा गणरायांचा गणेशोत्सव म्हणजे सगळ्यांसाठीच मोठा पवित्र आणि आनंदाचा सोहळा. हा गणेशोत्सव सुरू होऊन अनेक वर्षे लोटली आहेत. महाराष्ट्रात सन १८९२मध्ये सुरू झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे जनक म्हणून लोकमान्य टिळक आणि भाऊसाहेब रंगारी यांना ओळखले जातं. पारतंत्र्याच्या काळात विघ्नहर्त्या गणरायाच्या साक्षीने, जनतेने एकत्र यावे, बुद्धिदात्या गणपतीसमोर स्वातंत्र्यभान, समाजभान आणणारे कार्यक्रम सादर व्हावेत, त्यामधून जनजागृती व्हावी या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाला. त्या काळासाठी गरजेचे असेच ते पाऊल होते. पुढे सन १९४७मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरही अनेक वर्षे - घरगुती असो वा सार्वजनिक - गणेशोत्सवाचे स्वरूप मंगलमय,आनंदमय, बुद्धिमय असे होते. पूर्वी घरगुती मूर्तीपेक्षा सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मूर्ती मोठ्या व उंच असत. पण त्यांच्या उंचीला स्पर्धेचे स्वरूप आलेले नव्हते. कुणाच्या मंडळाची गणेशमूर्ती अधिक उंच, अशी स्पर्धा तेव्हा नव्हती. टाळ-मृदुंगाच्या तालात अभंग, भजने म्हणत गणरायांचे आगमन आणि विसर्जन होत असे. उत्सवात प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर होत होते. कोणत्याही सार्वजनिक गणेशाचे दर्शन घेणे तेव्हा अत्यंत सुलभ होते, कारण मूर्तीला बंदिस्त स्वरूप आलेले नव्हते. थोडक्यात, गणेशाचा उत्सव संयमाने, समजुतीने आणि सौहार्दपूर्णतेने साजरा केला जात होता. भाविक गणरायांच्या दर्शनाला येत होते, पण त्या गर्दीने झुंडीचे रूप घेतलेले नव्हते. मुळात गणराय आणि भाविक यामध्ये रंगांचा अंतराय नव्हता, त्यांच्यात अडथळे उभारले गेले नव्हते. परंतु, गेल्या काही वर्षांत या आणि सगळ्याच सार्वजनिक उत्सवांमधला आनंद संपून त्याला जे व्यावसायिक, स्पर्धात्मक आणि दणदणाटी स्वरूप येत चालले आहे ते खरोखर चिंताजनक आहे, आणि हे विचार करणाऱ्या प्रत्येकाला मनापासून जाणवत आहे. दिवसेंदिवस प्रचंड वाढत जाणारी लोकसंख्या, काँक्रिटची उभी राहणारी जंगले आणि या सगळ्यामधून वेगाने पुढे जाणारे सामाजिक जीवन असा भवताल बदलतो आहे. मनुष्याची बदलून गेलेली विचारशक्ती, बदललेल्या आवडी निवडी, आणि त्याचबरोबर सार्वजनिक सणांना आलेले व्यावसायिक रूप अशा सगळ्या गोष्टींमध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप खूप दणदणाटी, दिखाऊपण ल्यालेले आणि असह्य वाटावे असे झालेले दिसते. गणेशमूर्तीची उंची, रस्ते अडवून उभारले जाणारे प्रचंड मोठे मंडप, प्रखर दिव्यांचा झगमगाट (लेझर किरणांचा वाईट परिणाम आज आपण वाचतोच आहोत), संपूर्ण दिवस मोठ्या आवाजात सुरू असलेले लाउडस्पीकर, भाविकांना आकर्षित करण्यासाठी, आपापल्या गणेशोत्सवाची आणि आपल्या मंडळांची योजनाबद्ध रीतीने केली जाणारी प्रसिद्धी, ठराविक सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मंडपापासून दूर दूरपर्यंत पसरलेल्या रांगांमध्ये, आपल्या लेकराबाळांसह कित्येक तास उभे असलेले स्त्री-पुरुष, आबालवृद्ध भाविक मंडळी असे चित्र अनेक ठिकाणी दिसते. रांगांमधून उभे राहिल्यानंतर मंडपात शिरताना होणारी प्रचंड ढकलाढकली, रेटारेटी आणि त्या विघ्नहर्त्याचे दर्शन घेण्याच्या घाईतून आजूबाजूच्या लहान मोठ्या माणसांना ढकलून, माणूसपण विसरून पळत सुटणारी श्रद्धाळू भाविकमंडळी हे चित्रदेखील अनेक ठिकाणी दिसते. हे चित्र कशाचे द्योतक आहे, हेच कळेनासे झाले आहे. मूर्तिकारांनी घडवलेला विविध रूपांतला गणपती ही संकल्पना मुळात एकच आहे. त्या निर्गुण निराकार रूपाला आपण एका सगुण रूपात पाहत असतो, पूजत असतो, त्याची भक्ती करत असतो, आपल्या मनीचे मनोगत त्याच्या कानांवर घालत असतो. अशा वेळी इतर जातांत म्हणून आपणही गर्दीत, लोंढ्यामागे जायचे, की गणरायांवर डोळस श्रद्धा ठेवायची याचा विचार सगळ्यांनीच करायला हवा. एका विविक्षित ठिकाणच्या सार्वजनिक गणेशाच्या दर्शनासाठी तान्ह्या लेकरा-बाळांना काखोटीला मारून, तासनतास रांगेत तिष्ठत, ताटकळत आपण का उभे राहतो? अमुक एका गणपतीचे इतके तास रांगेत उभे राहून दर्शन मिळवले या अभिमान काय, नि त्यात सगळ्यांना सांगावे असे काय आहे? योजनाबद्ध रीतीने पसरवल्या जाणाऱ्या, भाविकांच्या श्रद्धेला हात घालणाऱ्या आवाहनांना यातून आपण बळी पडत असतो. या सगळ्या गोष्टी आपल्या लक्षात येतच नाहीत, की आपण समजून उमजूनही तिकडे दुर्लक्ष करत आहोत, असा प्रश्न या निमित्ताने पडतो. पूर्वी सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्र, शारदोत्सव अशा सार्वजनिक सोहळ्यांमध्ये भजनांचे, संगीत मैफिलींचे कार्यक्रम, एखादे संगीत नाटक, चर्चासत्र, विविध क्षेत्रांतील थोर व्यक्तींची व्याख्याने असे कार्यक्रम होत असत; आणि महत्त्वाचे म्हणजे रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने या कार्यक्रमांना उपस्थित राहून त्यांचा आनंद घेत असत. आज हे सगळे हातातल्या लहानशा गॅजेटवर एक कळ दाबताच उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे असे कार्यक्रम ठेवलेच तर त्यांना उपस्थिती



फारच तुरळक असते, हे खेदजनक वास्तव आहे. पूर्वी हाती टाळ घेऊन मृदुंगाच्या, सुस्वर भजनांच्या तालावर गणरायांचे आगमन होत असे. आज आगमनाला आणि विसर्जनाला जो काही प्रचंड आवाज, कर्णकर्कश संगीत, आणि हे कमी की काय म्हणून डोके उठवणारा तालसूर जराही नसलेला एकसुरी ताशा वाजत असतो, त्यातून उत्सवाचा निर्भेळ आनंद कधीच हरवल्याचे जाणवते. कोणत्याही उत्सवाला प्रचंड आवाज, वाद्यांचा दणदणाट, डीजे अशा आवाजाचे प्रदूषण करणाऱ्या गोष्टी आता आपण जणू सवयीच्या केल्या आहेत. उत्सव साजरा करण्याच्या या कर्कश पद्धतींमध्ये आपण इतके वाहून जात आहोत, की आपल्या आजूबाजूची वयस्कर, वृद्ध, आजारी माणसे, तान्ही बाळे, मुके प्राणी, पक्षी यांचा आपल्या मनात जराही विचार येत नाही. त्यांना या लाउडस्पीकरचा, प्रचंड गोंगाटाचा किती त्रास होत असेल, याचे जराही भान आपल्याला उरलेले नाही. या सगळ्या गोष्टींना काही ठिकाणी अपवाद आहेत, हे मान्यच. आजही काही ठिकाणी गणेश आगमनाच्या, विसर्जनाच्या मिरवणुका शिस्तीत, भक्तिमय वातावरणात निघतात. काही ठिकाणी आजही चांगले, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मात्र या गोष्टी अपवादच ठरत आहेत. या अपवादाच्या गोष्टी वाढत जायला हव्यात.

---

# फिटनेस आणि भक्तीचा संगम: दिशा फिटनेस जिममधील तरुणांनी बसविला गणपती बाप्पा...

## ढोल ताशाच्या गजरात बाप्पा झाले विराजमान...

**जनसंचलन/बुलढाणा**

जिथे घाम गाळून शरीर कमावले जाते, त्याच जिममध्ये गणपती बाप्पा विराजमान झाले आणि बाप्पाच्या आगमनाने तेथील वातावरणच बदलले आहे. बुलडाणा शहरातील दिशा फिटनेस या जिममधील तरुणांनी एकत्र येऊन फिटनेस आणि भक्तीचा अनोखा संगम साधला आहे. या जिममध्ये उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. जिमला आकर्षक फुलांनी सजवले आहे. बाप्पाच्या आगमनामुळे जिममध्ये एक सकारात्मक ऊर्जा जाणवत आहे, असे जिमचे मालक आणि प्रशिक्षक म्हणाले.





या खास उपक्रमामुळे रोजच्या व्यायामासोबतच अध्यात्मिक वातावरणाचा अनुभव मिळत आहे. अनेक तरुण आपल्या दिवसाची सुरुवात बाप्पाच्या दर्शनाने करतात आणि मग व्यायामाला सुरुवात करतात. सकाळी सर्वप्रथम बापाची आरती करण्यात येते त्यानंतर व्यायामला सुरुवात करण्यात येते.संध्याकाळी आरती आयोजित केले जातात, ज्यात जिममधील सर्व सदस्य उत्साहाने सहभागी होतात. या अनोख्या उपक्रमामुळे फिटनेससोबतच सण-उत्सवाचे महत्त्व टिकून राहिले आहे. यामुळे व्यायामशाळा केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक आणि आध्यात्मिक विकासाचे केंद्रबनली आहे

# पैसे न दिल्याने एकावर चाकू हल्ला!

**जनसंचलन/ चिखली**

जडीबुटी विकणाऱ्या एका विक्रेत्यास दारू पिण्यासाठी पैसे मागण्यात आले; मात्र पैसे देण्यास नकार दिल्याने गावगुंडाने त्याच्यावर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना २७ऑगस्ट रोजी सकाळी घडली. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. गणेश गजराजीसिंग ठाकूर (३८, रा. परसुडी रोड, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती), असे गंभीर जखमी झालेल्या विक्रेत्याचे नाव आहे. त्यांच्यावर चिखली उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, प्रकृती स्थिर आहे. गणेश ठाकूर हे वृद्ध आई-वडिलांसह गावोगावी पाल ठोकून जडीबुटी विक्री करून उदरनिर्वाह करतात. मागील ३५ दिवसांपासून ते शहरातील जाफ्राबाद रोड परिसरात वास्तव्यास असून, तेथे जडीबुटीची




विक्री करीत होते. याच भागातील आरोपी शेख शकील शेख इसराइल उर्फ शक्कू (२८, रा. गौरक्षण वाडी, चिखली) याने याआधीही ठाकूर यांना दारू पिण्यासाठी पैसे मागितले होते. त्यावेळी त्यांनी वेळ मारून नेली होती. मात्र, २७ ऑगस्ट रोजी सकाळी शेख शकीलने त्यांना अडवले. गणेश ठाकूर यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर शकीलने चाकूने वार करत त्यांना गंभीर जखमी केले. खिशातून चाकू काढून त्यांच्या गळ्यावर वार केला. त्यांना स्थानिकांनी उपचारासाठी हलविले. रुग्णालयात

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ट्रकची समोरासमोर धडक, एकाचा मृत्यू, जेसीबी आणि क्रेनच्या मदतीने काढली बॉडी, जळगावात खळबळ

**जळगाव :** जळगाव शहरापासून नवीनच पारधी ते तरसोद नवीन राष्ट्रीय महामार्ग हा नुकताच सुरू झाला आहे आणि या महामार्गावर एका साईडने वाहनांची वर्दळ सुरू झाली असल्याने या ठिकाणी अपघाताच्या प्रमाणामध्ये वाढ झाली आहे. आजच सकाळी पारधीजवळ दोन मालवाहू ट्रकची समसमोर धडक होऊन यात एका ट्रकचा चालक जागी ठार झाला असून इतर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

जळगाव शहरापासून जवळ असलेल्या पारधी ते तरसोद दरम्यानच्या नवीन राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी २७ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास दोन मालवाहू ट्रकची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात एका ट्रकचा चालक जागीच ठार झाला असून, इतर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. तर क्लीनर थोडक्यात बचावला आहे.

अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, बचावकार्य करण्यासाठी जेसीबी आणि क्रेनची मदत घ्यावी लागली.अपघाताच्या वेळी (जीजे १६ एवाय ००७८) क्रमांकाच्या ट्रकमध्ये दगडी कोळसा भरलेला होता, तर (एपी ३९ यूएफ ३५९९) क्रमांकाच्या दुसऱ्या ट्रकमध्ये बांधकामासाठी लागणाऱ्या टाइल्स होत्या. दोन्ही ट्रक कचरा फॅक्टरीजवळ एकमेकांवर आदळले. या जोरदार धडकेमुळे दगडी



कोळशाने भरलेला ट्रक उलटला आणि दुसऱ्या ट्रकमधील टाइल्सचा ढिगही रस्त्यावर पसरला.या अपघातात टाइल्सने भरलेल्या ट्रकचा चालक जागीच ठार झाला. त्याच्यासोबत असलेला क्लिनर मात्र प्रसंगावधान राखून उडी मारल्याने बचावला, पण त्याला किरकोळ दुखापत झाली. दुसरीकडे, दगडी कोळशाने भरलेल्या ट्रकचे चालक आणि क्लिनर हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात दोन्ही ट्रकचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. मृत चालकाचा मृतदेह ट्रकच्या केबिनमध्ये अडकल्याने त्याला बाहेर काढणे अवघड झाले. जेसीबी आणि क्रेनच्या मदतीने ट्रकचा भाग बाजूला करून मृताचा देह बाहेर काढण्यात आला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती, मात्र पोलिसांच्या मदतीने वाहतूक पूर्ववत करण्यात आली. पोलिसांनी अपघाताची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

# जीवन-मरणाचा सामना करतोय लोकप्रिय अभिनेता

## कार्यक्रमादरम्यान आला हृदयविकाराचा झटका



**मुंबई -** प्रसिद्ध मल्याळम अभिनेता राजेश केशवच्या चाहत्यांसाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. राजेश एका कार्यक्रमाला गेला होता. कार्यक्रमादरम्यान, तो स्टेजवर बेशुद्ध झाला. अभिनेत्याला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आलं तेव्हा डॉक्टरांनी त्याला हृदयविकाराचा झटका आल्याचं सांगितलं. अभिनेत्याचे चाहते त्याच्यासाठी प्रार्थना करत आहेत. रिपोर्टनुसार, राजेश केशवला रुग्णालयात नेताच त्याची तपासणी सुरू झाली. तपासणीनंतर अभिनेत्याला हृदयविकाराचा झटका आल्याचं सांगण्यात आलं. डॉक्टरांनी ताबडतोब राजेशवर अँजिओप्लास्टी केली आहे आणि आता त्याला आयसीयूमध्ये व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आलं आहे. पुढील ७२ तासांनंतरच त्याच्या प्रकृतीत सुधारणा होईल असं सांगण्यात आलंय. अभिनेत्याची प्रकृती सध्या खालावलेली आहेदिग्दर्शक प्रताप जयलक्ष्मी यांनी राजेश केशवच्या प्रकृतीबाबत एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये त्यांनी चाहत्यांना राजेशबद्दल माहिती दिली आहे. त्यांनी लिहिलं की, आमचा प्रिय राजेश, ज्याने थिएटरमध्ये स्वतः ची जादू पसरवली तो आता फक्त मशीनच्या मदतीने श्वास घेत आहे. रविवारी रात्री, क्राउन प्लाझा येथे जल्लोष आणि झगमगाटात नशिबानं त्याला खाली पाडलं. डॉक्टर म्हणतात की, त्याला हृदयविकाराचा झटका आला होता आणि तेव्हापासून त्यानं डोळे उघडले नाहीत. पण आम्हाला राजेश माहित आहे, तो खचून जाणाऱ्यांपैकी नाहीये. हा तोच आत्मा आहे ज्याने आपल्याला हसवलं, आनंदी ठेवलं आणि नाचवलं. तो कोणत्याही रुग्णालयाच्या बेडवर नाही, तो स्टेजवर आहे, आमच्या आयुष्यात आहे. प्रताप जयलक्ष्मी यांनी त्यांच्या पोस्टमध्ये चाहत्यांना प्रार्थना करण्याचं आवाहन केलं आहे. त्यांनी पुढे लिहिलं आहे- आता त्याला केवळ औषधाचीच नाही तर आपल्या प्रेमाची आणि प्रार्थनांचीही गरज आहे. कारण राजेशसारखा माणूस शोसोडून कधीही जाऊ शकत नाही. दरम्यान, राजेश केशवच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं तर त्याने नी-ना, ब्युटीफुल, हॉटेल कॅलिफोर्निया, शेरो यांसारख्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

# विधानपरिषदेसाठी दादांचा उमेदवार ठरला



**मुंबई:** विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठी २७ मार्चला निवडणूक पार पडणार आहे. त्यापैकी तीन जागा भाजपच्या वाट्याला आल्या आहेत, तर प्रत्येकी एक जागा ही शिवसेना आणि अजित पवार गटाला मिळाली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून उमेदवाराचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. राष्ट्रवादीकडून संजय खोडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता एकाच घरात पती-पत्नी आमदार पाहायला मिळणार आहेत. अजित पवार यांचे निकटवर्तीय अमरावतीचे राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांना विधान परिषदेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या पत्नी सुलभा खोडके या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या आमदार आहेत. त्यामुळे आता हे पती-पत्नी वेगवेगळ्या पक्षातून आमदार पाहायला मिळतील.पाच विधान परिषदेच्या (२०२५) जागांसाठी भाजपकडून तीन नावांची घोषणा करण्यात आली आहे. भाजपकडून संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर, शिवसेना शिंदे गटाकडून माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून संजय खोडके यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे.अजित पवार गटाकडून झिशान सिद्दीकी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरु होती. त्यांना उमेदवारी मिळणार असं बोललं जात होतं. मात्र, त्यांच्या नावाला पक्षांतर्गत प्रचंड विरोध होता. त्यानंतर काही अजून नावही चर्चेत होती. मात्र, आता एक वेगळंच नाव समोर आलं आहे. संजय खोडके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त असल्याने त्यासाठी २७ मार्चला निवडणूक होणार आहे. त्यासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख आहे. विधानसभेवर निवडून गेलेल्या पाच विधान परिषद सदस्यांच्या राजीनाम्यामुळे या जागा रिक्त झाल्याने त्या जागांवर ही निवडणूक होत आहे. त्यामध्ये भाजपच्या वाट्याला तीन तर राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडे प्रत्येकी एक जागा आली आहे. या पाचही जागांसाठी आता उमेदवारांच्या नावांची घोषणा झाली आहे.

# शिवतीर्थातला व्हिडीओ समोर, लाखो मराठी भाषिकांनी पाहावा असा क्षण, राज-उद्धव जेव्हा एकत्र येतात



**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या ठाकरे बंधूंच्या भेटीगाठीने नवा ट्विस्ट आला आहे. गेल्या दोन दशकांपासून एकमेकांच्या विरोधात असलेले ठाकरे बंधू एकत्र येत आहेत. त्यांच्यातील कटुता आता दूर झाली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यात आता भेटीगाठी वाढल्या आहेत. राज ठाकरे यांनी नुकतंच उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्त मातोश्री निवासस्थानी जात आपल्या मोठ्या भावाला सरप्राईज दिलं होतं. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना प्रत्यक्ष भेटून वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या होत्या. तसेच दोन्ही ठाकरे बांधवांचा एकत्र मेळावा झाला होता. यानंतर गणेशोत्सवाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आज पहिल्यांदा राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी गेले. राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह आहे. घराघरांत गणपती बाप्पाचं आगमन झालं आहे. राज ठाकरे यांच्या घरी देखील गणरायाचं आगमन झालं आहे. गणरायाच्या दर्शनाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आज राज ठाकरे यांच्या घरी कुटुंबासह गेले. यावेळी दोन्ही भावांमध्ये स्वतंत्र चर्चा देखील झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे शिवतीर्थ बंगल्यात नेमक्या कशा भेटीगाठी झाल्या हे दाखवणारा व्हिडीओ आता समोर आला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र यावं अशी शिवसैनिकांसह मैनसैनिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी होती. मुंबई आणि राज्यातील लाखो मराठी भाषिकांची ही इच्छा होती. अखेर दोन्ही भाऊ आता एकत्र येताना दिसत आहेत. दोन्ही भावांनी एकत्र यावं ही दिवंगत शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचीदेखील इच्छा होती. त्यांची ही इच्छा आता पूर्ण होताना दिसत आहेत. मुंबई, महाराष्ट्र आणि ठाकरे यांचं एक वेगळं नातं राहिलेलं आहे. महाराष्ट्राचं राजकारण ठाकरेंशिवाय पूर्ण होत नाही. पण दोन ठाकरे भावांमध्ये फूट पडलेली होती. पण आता ते एक होताना दिसत आहेत. त्यामुळे लाखो मराठी भाषिकांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

# दानवे-विखे यांच्यात गुफ्तगू, बंद दाराआडच्या बैठकीनंतर माध्यमांसमोर, म्हणाले...



**शिर्डी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील आपल्या ताफ्यासह मुंबईच्या दिशेने कूच करत आहेत. या आंदोलनाला राज्यभरातून प्रचंड समाज बांधवांचा समर्थन लाभत असून प्रत्येक जिल्ह्यात शेकडो समर्थक जरांगे यांच्या ताफ्यात सामील होत आहेत. बुधवारी संध्याकाळी जरांगे यांचा ताफा अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगावात दाखल झाला. यावेळी जेसीबी मशीनच्या लोडरमधून पुष्पवृष्टी करत त्यांचे स्वागत करण्यात आले. दरम्यान, मनोज जरांगे यांच्या या प्रवासामुळे राजकीय हालचालींना देखील वेग आला आहे.अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजीमंत्री रावसाहेब दानवे यांची शिर्डीत भेट झाली. त्यांच्यात शासकीय विश्रामगृह येथे बंद दाराआड जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेत नेमकं काय सुरू होतं? याबद्दल अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, जरांगे यांचा ताफा नगर जिल्ह्यात दाखल होत असताना ही गुप्त बैठक घेण्यात आल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.मराठा आरक्षणाचा प्रश्न हाताळताना शासन अडचणीत सापडल्याचे बोलले जात असताना, वरिष्ठ नेतेमंडळींनी घेतलेली ही बैठक भविष्यातील धोरण आखणीसाठी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. जरांगे यांच्या आंदोलनामुळे सरकारवर ताण वाढत चालला असून या पार्श्वभूमीवर विखे दानवेंची बैठक अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा आहे. पुढील काही तासात जरांगे यांचा ताफा नगर जिल्ह्यातील विविध भागातून प्रवास करत आळेफाटा येथे जाणार आहे. पुढे नेमक्या काय घडामोडी घडतात ?याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.रावसाहेब दानवे यांच्या भेटीनंतर राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. ङ्कमनोज जरांगे पाटलांबरोबर चर्चा करण्याचा विषयच नाही. त्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. त्यांनी भेटण्याची आणि चर्चेची भूमिका मांडली तर आम्ही नक्की विचार करू. शिंदे समितीला पूर्ण अभ्यास करण्यासाठी कालावधी दिला पाहिजे. हीच जरांगेंना विनंती आहे.

रावसाहेब दानवे हे व्यक्तिगत कामासाठी आले आणि वैयक्तिक भेट झाली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर चर्चा झाली नाहीङ्ख, असं स्पष्टीकरण विखे पाटलांनी दिलं.लोकशाहीत सर्वांना आंदोलनाचा अधिकार आहे. मात्र आंदोलन करताना इतरांना त्रास होवू नये, शांततेत आणि कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आंदोलन करावे. आरक्षण मिळावे यासाठी आमचा आणि सरकारचा पाठिंबा आहे. फडणवीस सरकारने मराठ्यांना आरक्षण दिले होते. राज्यात सत्तांतरानंतर मविआने सुप्रीम कोर्टात आरक्षण घालवले. आता नव्याने आरक्षणाची मागणी होतेय. सरकार काही मुद्द्यांवर अभ्यास करतंय. शिंदे समितीची नियुक्ती झालीय, त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. शिंदे समितीच्या अहवालाची वाट बघितली पाहिजे. कुणी एक माणूस हे विषय ठरवू शकत नाही. समितीच्या शिफारशीवर पुढील कारवाई होईलङ्कङ्क, अशी प्रतिक्रिया रावसाहेब दानवे यांनी दिली.

# विरार इमारत दुर्घटना, बिल्डिंग चाळीवर कोसळली, पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू, ९ जण जखमी

**विरार:** विरारच्या नारंगी येथील रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग कोसळून भीषण दुर्घटना घडली. यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी पाहणी करून बचाव कार्याचा आढावा घेतला. इमारतीचा शेजारील चाळीवर कोसळल्याने चाळ उद्ध्वस्त झाली असून, अनेक रहिवासी ढिगाऱ्याखाली दबले गेले असल्याची शक्यता आहे.कोसळलेल्या इमारतीच्या अपार्टमेंटमध्ये एकूण ५० सदनिका होत्या त्यापैकी १२ सदनिका कोसळल्या असून, ढिगाऱ्याखाली १५ ते २० लोक अडकले असावेत अशी भीती व्यक्त केली जात आहे. जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांना दुर्घटनेची माहिती मिळताच बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले.

त्यानुसार वसई-विरार महानगरपालिका अग्निशमन दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल घटनास्थळी तात्काळ दाखल झाले व रात्रीपासूनच मदत व बचावकार्य सुरू केले.

बुधवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत एकूण १४ जणांना इमारतीच्या कोसळलेल्या ढिगार्यातून बाहेर काढण्यात आले. त्यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला असून या दुर्घटनेत ९ जण जखमी आहेत. मृत ३ जणांची ओळख पटली असून २ जणांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. लक्ष्मण सिंग (२६ वर्ष) , आरोही ओंकार जोवील (२४ वर्षे), उत्कर्षा जोवील (१ वर्षे) यांचा मृत्यू झाला आहे. प्रमिला प्रभाकर शिंदे (५०), प्रेरणा शिंदे (२०), प्रदीप कदम (४०), जयश्री कदम (३३), मिताली परमार (२८), संजय स्वपंत सिंग (२४), मंथन शिंदे (१९), विशाखा जोवील (२४), प्रभावकर (५७) अशी दुर्घटनेतील




जखमींची नावे आहेत. ३ जणांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले असून, ६ जणांवर उपचार सुरू आहेत.एन. डी. आर. एफ. ची अतिरिक्त तुकडी अंधेरी येथून घटनास्थळी दाखल झाली असून अग्निशमन दल, स्थानिक पोलिस आणि महानगरपालिका यंत्रणांच्या मदतीने मलबा हटवण्याचे काम सुरू आहे. ढिगाऱ्याखाली अजूनही काही जण अडकले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सुरक्षेच्या दृष्टीने रमाबाई अपार्टमेंट शेजारील ४ मजली इमारत व आजूबाजूच्या चाळी रिकाम्या करून रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. प्रभावित नागरिकांसाठी समाज मंदिरात तात्पुरते निवारा शिबीर उभारण्यात आले असून, जेवणाची तसेच आवश्यक सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# पित्ताचे खडे झाले तर चुकूनही खाऊ नका हे ५ पदार्थ, पित्ताशयातील एकन् एक खडा फुटेल, लगेच करा डॉक्टरचे हे घरगुती उपाय

आपलं पोट जेवढं अन्न साठवून ठेवतं, त्याहून महत्वाची कामं काही लहान अवयव करीत असतात. त्यापैकी एक म्हणजे पित्ताशय. हा अवयव यकृताखाली असतो आणि त्यात पित्तरस साठवला जातो. पित्तरसामुळे अन्नातील चरबी पचते. पण कधी कधी जीवनशैलीतील गडबड, चुकीचा आहार आणि वाढतं वजन यामुळे पित्ताशयात कोलेस्टेरॉल, कॅल्शियम किंवा इतर घटक साचून तिथे छोटेमोठे कण तयार होतात. हेच पुढे मुतखड्याचं रूप घेतात. सुरुवातीला हे कण फार त्रास देत नाहीत. थोडं अपचन, पोटात जडपणा, सौम्य वेदना एवढं झालं तरी आपण दुर्लक्ष करतो.पण हळूहळू मुतखडा मोठा झाला की तीव्र वेदना, उलट्या, पचन बिघडणे यांसारख्या समस्या सुरू होतात. महिलांमध्ये ही समस्या पुरुषांपेक्षा जास्त प्रमाणात दिसून येते. यामुळे



वेळेत काळजी घेतली नाही तर शस्त्रक्रियेपर्यंतही वेळ येऊ शकतो. मात्र, सुदैवाने सुरुवातीच्या टप्प्यात काही साधे बदल करून पित्ताशयाची काळजी घेता येते आणि मुतखडा वाढू न देता थांबवता येते. चला तर जाणून घेऊ या त्याचे महत्त्वाचे मार्ग!पचन सुरळीत ठेवण्यासाठी आणि पित्ताशयावरचा ताण कमी करण्यासाठी तंतू फार महत्त्वाचे आहेत. तंतुमुळे आतड्यांची हालचाल योग्य राहते आणि कोलेस्टेरॉलचे प्रमाण नियंत्रणात येते. यासाठी रोजच्या जेवणात ओट्स, ज्वारीबाजरीसारखी संपूर्ण धान्यं, सफरचंद, पेरू, भोपळा यांसारखी फळं आणि भाज्या घ्याव्यात. या पदार्थांमुळे पित्ताशयावरचा ताण कमी होतो, त्यामुळे मुतखडा तयार होण्याचा धोका घटतो. ग्रामीण भागात जेवणात जास्त प्रमाणात भाजीधान्य वापरण्याची परंपरा आहे, तीच शहरी जीवनशैलीत पुन्हा आणणं गरजेचं आहे.मेथी, शेपू किंवा मोहरी या पालेभाज्यांत प्रचंड अँटीऑक्सिडंट्स असतात. अँटीऑक्सिडंट्स शरीरातील सूज कमी करतात आणि पित्ताशयासह संपूर्ण पचनसंस्थेला मजबुती देतात. दररोजच्या आहारात थोड्या प्रमाणात जरी पालेभाज्या घेतल्या तरी त्याचा फायदा दिसतो. यामध्ये मिळणारे जीवनसत्त्व , आणि हे पित्ताशय निरोगी ठेवतात. शिवाय पालेभाज्यांमध्ये लोह मुबलक असल्याने रक्तशुद्धी होते, जे अप्रत्यक्षरित्या पचनसंस्था सुधारतं

**नैसर्गिक ड्रिंक्सने शरीर डिटॉक्स करा**


पित्ताशयात खडे होऊ नये यासाठी शरीरातील विषारी द्रव्यं बाहेर टाकणं महत्वाचं आहे. यासाठी नारळपाणी, लिंबाचा रस, ग्रीन टी यांचा उपयोग होतो. नारळपाणी शरीराला थंडावा देऊन लघवीचं प्रमाण वाढवतं आणि अपायकारक घटक बाहेर टाकतं. सकाळी कोमट पाण्यात लिंबाचा रस घेतल्याने पित्ताशयावरचा ताण कमी होतो आणि मुतखड्याचे कण विरघळण्यास मदत मिळते, असं काही संशोधनात दिसून आलं आहे. अशा साध्या सवयी अंगिकारल्यास शस्त्रक्रियेपर्यंत जावं लागणार नाही

**घरगुती औषधं हळद, त्रिफळा आणि पुदीना**

आपल्या स्वयंपाकघरात अशी अनेक नैसर्गिक औषधं आहेत जी पित्ताशयासाठी वरदान ठरतात. हळद ही दाह कमी करणारी आहे, त्यामुळे ती लिव्हर आणि पित्ताशयाचं आरोग्य टिकवते. पुदिन्याचा चहा पचन सुधारतो आणि वेदना कमी करतो. तर त्रिफळा चूर्ण शरीर डिटॉक्स करून पचनसंस्थेला स्वच्छ ठेवतो. दिवसातून एकदोन वेळा कोमट पाण्यासोबत थोडं त्रिफळा चूर्ण घेतल्याने लिव्हर आणि गॉलब्लॅडर दोन्ही बळकट होतात.

# शरद पवार यांच्या पक्षाच्या शहराध्यक्षाची तब्बल २३ लाखांची फसवणूक...

**नागपूर :** परस्पर शेअर अन्य कंपनीत वळते करून राष्ट्रवादी काँग्रेस (शप) शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांची तब्बल २३ लाखांनी फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी नंदनवन पोलिसांनी ठकबाजाविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नंदन ओमप्रकाश गोस्वामी असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ठकबाजाचे नाव आहे. तो मध्यप्रदेशच्या थार जिल्ह्यातील सरदारपूर येथील रहिवासी आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, नोव्हेंबर २०२४ मध्ये परिचित दिनेश गोस्वामी यांच्या मार्फत पेठे यांची नंदन गोस्वामीसोबत ओळख झाली. नंदन हा माझा मामेभाऊ असून,





त्याला शेअर बाजाराचा चांगला अनुभव असल्याचे दिनेशने पेठे यांना सांगितले. त्यानंतर पेठे आणि नंदनमध्ये बोलणे सुरू झाले.माझी आर्थिकस्थिती हलाखीची असून मी बेरोजगार आहेफ, असे नंदन त्यांना म्हणाला. दिनेशचा मामेभाऊ असल्याने पेठे यांनी नंदन याला कार्यालयात राहण्यास परवानगी दिली. त्यानंतर नंदन हा पेठे यांच्यासाठी शेअर घेणे आणि विकण्यासह शेअर अकाऊंटचे व्यवस्थापन करायला लागला. त्याला पेठे यांच्या अकाउंटबाबत संपूर्ण माहिती होती. काही दिवसांनी त्याने पेठे यांना एका कंपनीत गुंतवणूक करायला सांगितले. त्यांनी त्या कंपनीत खाते उघडले. ३१ मार्च २०२५ मध्ये पेठे यांनी गुंतवणुकीची संपूर्ण माहिती सीएला द्यायची असल्याचे नंदन याला सांगितले. ढ्ढमी गावाला जात आहे, परत आल्यावर देतोफ,असे त्याने सांगून माहिती देण्यास टाळाटाळ करायला सुरूवात केली. नंदन हा महिन्यातून तीन ते चार वेळा गावाला जायला लागला. त्यामुळे पेठे यांना संशय आला. त्यांनी नंदनच्या मोबाईलवर संपर्क साधला. माझ्या वडिलांना घेऊन मी अहमदाबादेतील हॉस्पिटलमध्ये आल्याचे सांगून त्याने मोबाइल बंद केला. दरम्यान पेठे यांनी कार्यालयातील काउंटर बघितले असता त्यातील तीन लाखांची रोख गायब होती. ती नंदन घेऊन गेल्याचे त्यांना कळाले. त्यानंतर शेअर खात्याची तपासणी केली असता नंदन याने परस्पर अन्य खात्यात पेठे यांच्या परवानगीशिवाय २० लाख रुपयांचे शेअर वळते केले. हे खाते त्याने स्वत:च्या नावे ठेवल्याचे आढळून आले. फसवणूक झाल्याने पेठे यांनी नंदनवन पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी पोलिसांनी फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# चिंताजनक! शिक्षक पत्नी अन् दोन मुलांसह गुहागरहून हिंगोलीला निघाले

## अख्खं कुटुंब बेपत्ता, चिपळूणला शेवटचे लोकेशन

**रत्नागिरी:** कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातून गुहागर तालुक्यातील शिक्षक आपल्या पत्नीसह गावाला जाताना बेपत्ता झाल्याची माहिती आहे. या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गुहागर येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले ज्ञानेश्वर काळूराम चव्हाण हे आपल्या पत्नी आणि दोन मुलांसह मूळ गावी हिंगोली येथे गणपतीसाठी मंगळवारी निघाले होते. मात्र, वाटेत ते बेपत्ता झाले आहेत. आपल्या मूळ गावी निघालेले या कुटुंबातील पती - पत्नी अचानक बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. काल, मंगळवारी (२६ ऑगस्ट) सायंकाळी ५ वाजता चिपळूण परिसरात असताना त्यांच्याशी शेवटचा संपर्क झाला होता, अशी माहिती आहे. त्यानंतर मात्र त्यांचे दोन्ही मोबाईल फोन बंद येत असल्याने कुटुंबाची चिंता वाढली आहे. गणेशोत्सवासाठी आपल्या कुटुंबासह गावी जाण्यासाठी चव्हाण गुरुजींनी गुहागरहून प्रवास सुरू केला होता. काल सायंकाळी ५ च्या सुमारास ते चिपळूणला पोहोचले होते. त्यानंतर त्यांचा फोन बंद झाला असून, अद्याप त्यांच्याशी कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही. त्यांचे कुटुंबीय त्यांना शोधण्यासाठी हिंगोलीहून निघाले असून, त्यांनी मित्र आणि नातेवाईकांकडे चौकशी सुरू केली आहे.चव्हाण कुटुंब ज्या गाडीने प्रवास करत होते, ती गाडी किंवा त्यांना कोणी पाहिले असल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे कळकळीचे आवाहन चव्हाण



यांच्या कुटुंबियांनी केले आहे. या कठीण प्रसंगात मदत करण्यासाठी भारत देवकांत पाटण (संपर्क: ९८५०२७७९४२) आणि अभिजित गोळे सर (संपर्क: ८९७५७३२०९४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, चव्हाण कुटुंब सुरक्षित असावे अशी प्रार्थना सर्वजण करत आहेत. या घटनेची माहिती ज्यांच्याकडे असेल त्यांनी तातडीने पोलिसांना किंवा वरील दोन्ही व्यक्तींना संपर्क साधावा.

# असा पुत्र नको; पत्नीसोबत मिळून आईला मारहाण अन् मग संपवलं

**धाराशिव:** किरकोळवादाचे रूपांतर हाणामारीत होते किंवा भांडणांमध्ये होते. परंतु लोहारा येथे एक अघटीतच घटना घडली आहे. किरकोळ कारणावरून मुलगा आणि सुनेने मिळून आईला मारहाण करून फासावर लटकवल्याची भयंकर घटना लोहारा येथे घडली आहे. एका मुलाने आपल्याच जन्मादात्या आईची हत्या केल्याने लोहारा शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. उमाबाई सुरेश रणशुर असं ५५ वर्षीय हत्या झालेल्या आईचं नाव आहे.कानेगाव रोड इंदिरानगर येथे राहणारे सौदागर सुरेश रणशुर, पुजा सौदागर रणशुर (दोघे राहणार लोहारा ता. लोहारा जि. धाराशिव) यांनी २५ ऑगस्ट रोजी दुपारी बारा ते एक वाजण्याच्या सुमारास मृत उमाबाई सुरेश रणशुर (वय ५५ वर्षे, राहणार लोहारा तालुका लोहारा जिल्हा धाराशिव) यांना घरगुती भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन जिवे ठार मारले आणि तिला साडीने गळफास देवून मृत झाल्याचा बनाव केला.याबाबत, महेश सुरेश रणशूर (वय ३५ वर्षे, राहणार लोहारा तालुका लोहारा जिल्हा धाराशिव, हल्ली मुक्काम शिवहरी ग्रीन सिटी प्लॅट नं १०६ बी वापी तालुका



पार्डी जिल्हा वलसाड राज्य गुजरात) यांनी २६ ऑगस्ट रोजी दिलेल्या प्रथम माहितीवरुन पोलिस ठाणे लोहारा येथे भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) , ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेची माहिती मिळताच लोहारा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कोकणाळे यांनी घटनास्थळी भेट दिली. तेव्हा मृत महिलेचा मृतदेह सापडून आला. त्यांच्या मृतदेहावरील जखमा पाहता त्यांना मारहाण झाल्याचं निदर्शनास आलं. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ गुन्हाची नोंद करुन घेत दोन्ही आरोपींना अटक केली असून दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आला. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर हे करत आहेत. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतकऱ्यांच्या क्रांतिकारी राजाचे बुलढाण्यात थाटात आगमन!

## तुपकरांची कन्या श्रेयाने केली श्रीगणरायाची विधिवत पूजा;श्रेयाच्या हातून स्थापना, एल्गार मोर्चाचा देखावा ठरतोय आकर्षण...

**जनसंचलन/बुलडाणा**

संपूर्ण देशभरात आज गणरायाचे धुमधडाक्यात आगमन झाले. शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे जनसंपर्क कार्यालय असलेल्या क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर येथेही शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या क्रांतिकारी राजाचे थाटात आगमन झाले. ढोल ताशांचा गजर,डफड्यांचा ताल, फटाक्यांची आतिषबाजी आणि गुलालाची मुक्त उधळण अशा उत्साह पूर्ण वातावरणात चिखली रोडवर, त्रिशरण चौकानजीक क्रांतिकारी राजाची मिरवणूक निघाली. या मिरवणुकीत रविकांत तुपकरांनी ढोल ताशांच्या व डफड्यांच्या तालावर ठेका धरला, त्यांच्यासमवेत मोठ्या संख्येने तरुण मिरवणुकीत थिरकतांना दिसलें.रविकांत तुपकर व पत्नी शर्वरी तुपकरांनी भर रस्त्यावर फुगडी खेळून सर्वांचे लक्ष वेधले..!बुलढाणा शहरातील चिखली रोडवरील महावितरण कार्यालयापासून क्रांतिकारी राजाचा भव्य आगमन सोहळा सुरू झाला. रविकांत तुपकर यांच्यासह अनेक शेतकरी कष्टकरी या सोहळ्यात सहभागी झाले. मिरवणूक क्रांतिकारी हेल्पलाइन सेंटर जवळ आल्यानंतर रविकांत तुपकर यांची दत्तक कन्या श्रेया हिच्या





हस्ते श्री. गणरायांचे विधिवत पूजन करून स्थापना करण्यात आली. राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतमालाला भाव नाही, शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज मिळत नाही..मिळालेले कर्ज फेडण्यासाठी बँका शेतकऱ्यांकडे तगादा लावतात, मात्र शेतकऱ्यांनी कर्ज फेडायचे कसे? या विवंचनेत शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे सरकारला कर्जमुक्ती करण्याची, सोयाबीन कापसाला भाव देण्याची सदबुद्धी दे आणि शेतकऱ्यांवरील विघ्न दूर कर अशी प्रार्थना रविकांत तुपकर यांनी श्री. गणरायाकडे केल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. शेतकऱ्यांना संकटाचा सामना करण्याचे बळ, आणि लढायला ताकद मिळो अशीही प्रार्थना गणराया चरणी केली. शहरातील नागरिकही मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. क्रांतिकारी राजा श्री गणरायासमोर ॲड. शर्वरी तुपकर यांच्या संकल्पनेतून मांडण्यात आलेला देखावा आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. बैलगाडीवर उभे राहून आसूड उभारणारे रविकांत तुपकर, त्यांच्या दिमतीला असलेला शेतकरी कष्टकऱ्यांचा,फौजफाटा, पोलिसांचा बंदोबस्त असा एकंदरीत शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांसाठीच्या एल्गार मोर्चाचा देखावा क्रांतिकारी राजासमोर हुबेहूब थाटण्यात आला आहे.हा देखावा सगळ्यांना आकर्षित करतोय

# पोलीस विभागाने विधवा महिला सक्षमीकरणासाठी पुढे यावे..

## पोलीस विभागाने विधवा महिला गणेश उत्सवात विधवा महिलांना पूजेचा मान द्यावा... प्रा. डी.एस लहाने



**जनसंचलन/बुलढाणा**

गणपती, महालक्ष्मी हे महत्त्वाचे सण याच महिन्यात असल्याने या शुभ कार्यामध्ये विधवा महिलांना सन्मानाचे स्थान द्यावे, तसेच त्यांना पूजेचा सन्मान द्यावा असे अवाहन मनस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा . डी एस लहाने यांनी केले आहे. याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक यांना एक निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की,सार्वजनिक गणपती व इतर शुभ कार्याला पोलीस विभागाकडून परवानगी दिली जाते. परवानगी देत असताना गणेश मंडळांनी विधवा महिलांना आपल्या उत्सवामध्ये सहभागी करून घेण्याचे काम झाल्यास मोठे सामाजिक कार्य होऊ शकते.मानवाधिकार आयोगाने देखील विधवा महिलांबाबत सकारात्मक व सुधारणावादी भूमिका मांडली आहे. याचा दाखला देत मानस फाउंडेशनने जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याशी चर्चा केली. पारंपारिक धारणेनुसार विधवा महिलांना पूजाअर्चेचा मान दिला जात नाही. त्यांना शुभ कार्यापासून दूर ठेवले जाते. मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांच्यावर झालेला हा मोठा अन्याय आहे. शतकानुशतके तो होत आला आहे. आता आपण आधुनिक युगात लोकशाहीमध्ये वावरत आहोत. अशावेळी त्यांना देखील मानवतेच्या दृष्टीने सन्मानाचे स्थान देणे गरजेचे आहे. या निवेदनावर जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सकारात्मकता दर्शविली आहे. तसेच गणेश मंडळांनी दहा दिवसाच्या उत्सवामध्ये या महिलांना सहभागी करून कृतीयुक्त समाजकार्यात हातभार लावावा असे आवाहन लहाने यांनी केले. जी मंडळ या दहा दिवसाच्या काळामध्ये विधवा महिलांच्या हातून पूजाअर्चा, आरती व त्यांना सन्मानाचे स्थान देतील अशा मंडळांची दखल मानस फाउंडेशन घेणार आहे.बुलडाणा येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते मंडळांना सन्मानित केले जाणार आहे.

# सहकार विद्या मंदिर येथे क्लस्टर ९ फुटबॉल स्पर्धा (मुले) ची उत्साहात सुरुवात

**जनसंचलन/बुलडाणा**

स्थानिक सहकार विद्या मंदिर इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेमध्ये क्लस्टर ९ फुटबॉल स्पर्धा (मुले) दि.२६ ऑगष्ट ते ३० ऑगष्ट या दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन दि.२६ ऑगष्ट रोजी मा. आ. श्री. धीरजजी लिंगाडे यांच्या प्रमुख उपकस्थतीत, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात करण्यात आले. याप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून बौतूल, मध्यप्रदेश येथील मा.श्री.नितेशजी राजपूत व बुलढाणा जिल्हा फुटबॉल सचिव श्री. मुकेश बाफनाजी , डॉ.जीवनजी मोहोळ, जिल्हा क्रीडा अधिकारी, बुलढाणा अर्बन चॅरीटेबलच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर, बुलढाणा अर्बनचे संचालक श्री. गोपालजी चिराणीया, बुलढाणा अर्बनचे सल्लागार श्री. सचिनजी वौद्य आदी मान्यवर उपकस्थत होते. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजवंदनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्याच्या वतीने स्पर्धच्या उद्घाटनाची घोषणा करण्यात आली. वर्ग ७ वी च्या विद्यार्थीनी अत्यंत सुंदर नृत्य सादर करीत उपकस्थतांचे मन जिंकले. यावेळी वर्ग १० वी चा फुटबॉल विद्यार्थी चि.धनंजय दोनसुने याने क्रीडाज्योत प्रज्वलित केली. तर चि. अर्णव व्यास या विद्याथ्र्याने सर्व स्पर्धकांना क्रीडा शपथ दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. सुकेशजी झंवर यांनी सहकार विद्या मंदिरने इतक्या भव्य स्वरुपामध्ये या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. सहकार विद्या मंदिर ही एक निवासी शाळा आहे. येथे विद्याथ्र्यांच्या व्यकक्तमत्व विकासाबरोबर शारीरिक विकासावर लक्ष केंद्रित केल्या जाते. याबरोबरच विद्याथ्र्यांना शाळेमध्ये अनेक खेळांचे प्रशिक्षण दिल्या जाते. सहकार विद्या मंदिरच्या प्रशिक्षित विद्याथ्र्यांनी विविध खेळांमध्ये राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर आपल्या यशाची उत्तुंग कामगिरी केली आहे. बुलढाणा शहराकरीता ही गौरवास्पद बाब आहे की प्रथमच क्लस्टर ९ फुटबॉल स्पर्धा (मुले) या स्पर्धे चे आयोजनाचा मान बुलढाण्याला मिळाला आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले. प्रमुख पाहुणे मा. आ. श्री. धीरजजी लिंगाडे यांनी सहकार विद्या मंदिर ज्या उत्साहाने ही स्पर्धा आयोजित करीत आहे त्याचे कौतुक केले. मागील वर्षी देखील राष्ट्रीय रोप कस्कपींग स्पर्धा सहकार विद्या मंदिरने आयोजित केल्यानंतर बुलढाणा शहराचे नाव संपुर्ण देशभरात प्रसिध्द झाले असे त्यांनी आर्वजून नमुद करत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात. या स्पर्धेकरीता महाराष्ट्रासह, गोवा, दमण व दिव येथून देखील एकुण ६७ संघातील एकुण ११०० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला आहे. यामध्ये वयोगट-१४ वर्षे, वयोगट-१७ वर्षे, वयोगट-१९ वर्षे मुले समाविष्ट आहेत. शाळेने नुकतेच बनविलेले भव्य असे फुटबॉल टर्फ मौदान बघून स्पर्धकांनी आनंद व्यक्त केला. कारण पावसामध्ये देखील सदर स्पर्धा विना अडथळा सुरु असणार आहेत. स्पर्धेकरीता बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष






सन्माननीय श्री. राधेश्यामजी चांडक तसेच बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष डॉ. सुकेशजी झंवर व बुलढाणा अर्बन चॅरीटेबलच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर यांचे मार्गदर्शन व प्रेरणेमुळे सहकार विद्या मंदिर, बुलढाणा यांच्या अंतर्गत खेळ विभागातील सर्व प्रशिक्षक व सर्व अध्यापक वर्ग ही स्पर्धा सफल होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. सदर स्पर्धा या स.७.०० ते रात्री १०.०० पर्यत दररोज असणार आहेत. बुलढाणा शहरातील फुटबॉल प्रेमिनी सदर स्पर्धेचा आस्वाद घ्यावा असे आवाहन शालेय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मतदार यादीत घोळ निवडणूक आयोग गाफील?

## जयश्री शेळके म्हणाल्या.. बुलढाणा मतदारसंघाची फेरमोजणी करा!

**जनसंचलन/बुलढाणा**

मतदार यादीमध्ये घोळ झालाय. सरकारला नव्हे तर निवडणूक आयोगाला जाब विचारण्यात येणार असून दिल्लीत ३०० खासदार रस्त्यावर उतरले आहेत. दरम्यान बुलढाणा मतदारसंघातील मतांच्या फेरमोजणीची मागणी पराभूत उमेदवार जयश्री शेळके यांनी हायकोर्टात एका अर्जाद्वारे सादर केली आहे. महाविकास आघाडीमधील उद्धवसेनेच्या पराभूत उमेदवार जयश्री शेळके यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अर्ज दाखल करून बुलडाणा विधानसभा मतदारसंघात झालेल्या मतदानाची फेरमोजणी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.या मतदारसंघामधून शिंदेसेनेचे उमेदवार संजय गायकवाड हे विजयी झाले आहेत. त्यांना ९१ हजार ६६०, तर शेळके यांना ९० हजार ८१९ मते मिळाली. शेळके केवळ ८४१ मतांनी पराभूत झाल्या. त्यामुळे त्यांनी मतमोजणीवर आक्षेप घेतला आहे. निवडणुकीत अनियमितता झाली. मतदार यादीमध्ये ३ हजार ५६१ बोगस मतदारांचा समावेश होता.अनेकांची नावे दोन किंवा त्यापेक्षा जास्त ठिकाणी होती. अनेक ठिकाणी मृत मतदारांच्या नावावर मतदान करण्यात आले. परिणामी, मतदारसंघात वापरलेल्या सर्व इव्हीएम न्यायालयात आणून न्यायालयाच्या अधिकाऱ्यांसमक्ष फेरमोजणी करण्यात यावी, असे शेळके यांचे म्हणणे आहे.




### या कागदपत्रांची मागणीही केली!

**बुलडाणा मतदारसंघाची मतदार यादी, सर्व बुथवरील सीसीटीव्ही फुटेज, गायकवाड यांचे निवडणूक विजयाचे प्रमाणपत्र व इतर संबंधित कागदपत्र न्यायालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशीही मागणी शेळके यांनी केली आहे. त्याकरिता त्यांनी स्वतंत्र अर्ज दाखल केला आहे. शेळके यांच्यातर्फे अॅड. आकाश मून यांनी कामकाज पाहिले.**

---

## आ.संजय गायकवाड यांच्या अर्जास विरोध...

**जयश्रीताई शेळके यांनी गायकवाड यांच्याविरूद्ध निवडणूक याचिका दाखल केली आहे. गायकवाड यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेतील सातव्या ऑर्डरमधील नियम ११ अंतर्गत अर्ज दाखल करून ही निवडणूक याचिका फेटाळण्याची मागणी न्यायालयाला केली आहे. शेळके यांनी या अर्जालादेखील प्रत्युत्तर दिले आहे. गायकवाड यांचा अर्ज गुणवत्ताहीन वनिराधार आहे. त्यामुळे हा अर्ज फेटाळून निवडणूक याचिकेवर गुणवत्तेच्या आधारावर निर्णय देण्यात यावा, अशी विनंती शेळके यांनी न्यायालयाला केली.**

---

## नागरिकांची प्लास्टिकच्या फुलांनाच पसंती...

### फुलशेती करणारे शेतकरी अडचणीत, प्लास्टिक बंदीची मागणी

**जनसंचलन/ लोणार**

राज्यात प्लास्टिकच्या वापराला बंदी घालण्यात आली आहे. प्लास्टिक बंदीचा जागर सुरू असतानाच सणामध्ये प्लास्टिक फुलांमुळे नैसर्गिक फुलांकडे कोणी बघत नसल्याचे चित्र आहे. नैसर्गिक फ ुलांऐवजी नागरिक प्लास्टिकच्या फ ुले, तुरे, हारांचा वापरास पसंती देत आहेत. त्यामुळे फुलशेती करणारे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत. गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवात फुलांना अधिक महत्त्व असते. त्यामुळे सर्वत्रच फ ुलांना चांगली मागणी असते. ही मागणी ओळखूनच अलीकडे फुलशेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला होता. यात प्रामुख्याने झेंडू, निशिगंधाची शेती अधिक केली जाते. परंतु या फुलशेतीच्या मुळावर प्लास्टिक फुले आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. चार-पाच वर्षापूर्वी झेंडू आणि निशिगंधला चढ्या दराने मागणी होती. दसरा, गौरी-गणपती, मध्ये झेंडूला प्रतिकिलो ५० रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत दर मिळत होता, तर निशिगंधला प्रतिकिलो २०० रुपयांपासून काही हजार रुपयांपर्यंत दर मिळत होता. मात्र विविध उत्सवात प्लास्टिक फुलांचा वापर वाढला आहे. घरगुती गौरी गणपतीसह सार्वजनिक गणेशोत्सवातील आरास सजावटीसाठीही प्लास्टिक फुलांच्या माळांचा वापर वाढला आहे. केवळ सणासुदीत फुले, माळा व गजरे विक्री करून कुटुंबाची गुजराण करणाऱ्या अनेकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. या शिवाय पॉलीहाऊस आणि शेडनेटमध्ये लाखो रुपयांचा खर्च करून फुलशेती केली जाते. फुलांना भाव मिळाला नाही, तर शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणार आहेत. अनेक बेरोजगार युवकांचा फुलशेती करण्याकडे




कल वाढला आहे. त्यामुळे सरकारने प्लास्टिक फुलांच्या विक्रीवर बंदी घालावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. प्लास्टिक फुलांमुळे झेंडूच्या फुलांना मागणी कमी झाली. प्रतिकिलो ५ ते १० रुपये भाव मिळतो. उत्पादन खर्चही त्यातून निघत नाही. आर्थिक नुकसान सहन करावे लागते. अनेक वेळा फुलांना दर मिळत नसल्याने फ ुले रस्त्यावर फेकण्याची वेळ येत असल्याचे शेतकरी गजानन वाघ यांनीसांगितले.

## जय मातृभूमी गणेशोत्सवात नादब्रह्मचे आकर्षण

### ढोल ताशा पथक आणि ध्वज पथक सज्ज !लाईट शो आणि आतषबाजी फेडणार डोळ्यांचे पारणे !!

**जनसंचलन/बुलढाणा**

चैतन्य आणि मांगल्याची द्वाही फिरवणाऱ्या आणि विघहर्त्याच्या रूपाने येऊन सकारात्मकता पेरणाऱ्या गणरायांचा उत्सव आज, बुधवारपासून सुरू होत आहे. बुलढाण्यातही जय मातृभूमी सांस्कृतिक उत्सव समितीच्या वतीने अध्यक्ष यशवर्धन सपकाल यांच्या नेतृत्वत आपल्या गणरायाचा हा उत्सव उत्साहाने साजरा करण्याची जोरदार तयारी चालवली आहे. नाद प्रतिष्ठानचे ढोल ताशा पथक आणि ध्वज पथक त्यासाठी सज्ज असून गणपती बाप्पाचा स्वागत करण्यासाठी तरुणाईची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. गणेश चतुर्थीपासून गणेशोत्सवाची सुरुवात होते. हा भारतातील सर्वांत लोकप्रिय सणांपैकी एक सण आहे. त्याला विनायक चतुर्थी म्हणूनही ओळखले जाते. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी असा हा १० दिवसांचा गणेशोत्सव अत्यंत मनोभावे, उत्साहाने व आनंदात साजरा होतो. घरोघरी आणि मंडळांमध्ये गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. ढोल-ताशाच्या गजराता बाप्पाचे स्वागत केले जाते. आपल्या लाडका बाप्पांचे स्वागत करण्यासाठी जय मातृभूमी सांस्कृतिक समिती गेल्या पंधरा दिवसांपासून परिश्रम घेत आहे. चिंचोले चौक ,सर्कुलर रोड ,बुलडाना परिसरात मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले आहेत. आज बापाच्या आगमनासाठी हाच नादब्रह्म च्या आकर्षण असून त्या माध्यमातून ढोल आणि ध्वज पथक आपले कौशल्य दाखवणार आहे. सोबतच सायंकाळी लाईट शो आणि आताश बाजी देखीलकेलीजाणारआहे




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८